खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

## राष्ट्रीय सेवा योजना - आपत्ती व्यवस्थापन शिबीर

पुढारी

### राजगुरुनगर येथे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

**खेड : पुढारी वृत्तसेवा**

सेवा भारती पुणे ग्रामीणच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालय येथे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले होते. या प्रशिक्षणात १८ ते ४५ वयोगटातील स्त्री-पुरुष, तसेच हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबराव बट्टेपाटील महाविद्यालयातील एनएसएस व एनसीसीचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

पुणे जिल्हा हा आपत्तीच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील आहे. सह्याद्रीच्या कुशीत अनेक खेडी, वाड्या-वस्त्या वसलेल्या आहेत. अनेक धरणे, नद्या, पर्यटन स्थळे आहेत. त्यामुळे अनेकदा आपत्तीजनक परस्थिती उद्भवते. माळीनची भूस्खलन किंवा पाईट येथील कुंडेश्वर अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत. तसेच जिल्ह्यात अनेक कारखाने, त्यामुळे होणारी वाहतूक समस्या, अपघात ही मोठी समस्या झाली आहे. सध्या अनेक ठिकाणी अतिवृष्टी, ढगफुटीचेही प्रकार वाढले आहेत. या पार्श्वभूमीवर सेवा भारती पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या वतीने प्रत्येक जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येत आहे.



राजगुरुनगर येथे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणात प्रात्यक्षिक दाखवताना प्रशिक्षक.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील प्रशिक्षणात आपत्ती, धोके, आपत्ती व्यवस्थापन चक्र, प्रथमोपचार कसा करावा, फिट आल्यास काय करावे, सर्पदंश, त्रिकोणी बँडेजचे प्रकार, आणीबाणीच्या उचल पद्धती, दोरीच्या गाठी, कृत्रिम श्वसन, तसेच आगीचे प्रकार व विविध पद्धतीने आग कशी विझवली जाते याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. पुणेचे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षक राहुल पोखरकर, श्रीकृष्ण पाटील व चाकण नगरपरिषदेचे अग्निशामक दलाचे अधिकारी प्रकाश वाघ यांनी प्रशिक्षण दिले.

प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भास्कर भोसले, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, सेवा भारती पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे अविनाश नाईक, विनोद देशपांडे, खेड तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष संजय बोरकर, पुणे विभाग सेवा शिक्षण प्रमुख सुरेश कोबल यांच्याहस्ते करण्यात आले. प्रास्ताविक सेवा भारती पुणे ग्रामीणचे सचिव अरुण साळुंके यांनी केले. तर आभार महेश घाडगे यांनी मानले.

My Pune Gramin Edition
Oct 08, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख